# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ मध्ये महा मेट्रोला 'सर्वोत्कृष्ट स्टॉल' पुरस्कार



नागपूर | ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ या तीन दिवसीय प्रतिष्ठित औद्योगिक व गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो) यांना त्यांच्या प्रभावी सादरीकरणाबद्दल 'सर्वोत्कृष्ट स्टॉल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार महा मेट्रोच्या वतीने श्री. श्रावण हर्डीकर व संचालक (स्ट्रॅटेजीक प्लॅनिंग) श्री. अनिल कोकाटे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री तथा माननीय श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते

स्वीकारला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती शोभा करंदलाजे, महाराष्ट्र शासन,डॉ. पंकज भोयर, महापौर श्रीमंती नीता ठाकरे  व इतर मान्यवर उपस्थित होते.

या तीन दिवसीय कार्यक्रमादरम्यान महा मेट्रोच्या स्टॉलला उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, गुंतवणूकदार, शासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली. हजारो अभ्यागतांनी महा मेट्रोच्या स्टॉलला भेट देत नागपूर  मेट्रो प्रकल्पांविषयी माहिती घेतली.

महा मेट्रोच्या स्टॉलमध्ये मेट्रो प्रकल्पांचे विविध पैलू सविस्तरपणे सादर करण्यात आले. यामध्ये नॉन-फेअर बॉक्स रेव्हेन्यू अंतर्गत व्यावसायिक संधी, प्रवासी संख्येतील वाढ (Ridership Activity), प्रवासी सुविधा, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, तसेच बाह्य प्रकल्प (External Projects) यांचा समावेश होता. महा मेट्रोच्या शाश्वत विकास धोरणांबरोबरच आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वयंपूर्ण सार्वजनिक वाहतूक मॉडेलचे प्रभावी दर्शन या स्टॉलद्वारे घडवण्यात आले.

या सर्व बाबींमुळे महा मेट्रोच्या स्टॉलला अभ्यागतांकडून मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि त्याची दखल घेत आयोजकांकडून ‘सर्वोत्कृष्ट स्टॉल’ पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

हा पुरस्कार महा मेट्रोच्या सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि पारदर्शक व व्यावसायिक व्यवस्थापनाची पावती असून भविष्यातही महा मेट्रो नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित, पर्यावरणपूरक व शाश्वत वाहतूक सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे अधोरेखित करतो.